दैनिक
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड । सोमवार
०९.१२.२०२४
वर्षे : ४ अंक : २४२
किंमत : ३ रू. पाने : ४

RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 dailymarathwadapatra2021@gmail.com https://epaper.marathwadapatra.com








# सीमा वादाचे पुन्हा कर नाटक

## बेळगावात पुन्हा एलगार,फडणविसांना आव्हान

मुंबई, दि. ८ (मराठवाडा पत्र न्युज) :महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादाचा प्रश्न पुन्हा एकदा पेटण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीचं उद्या बेळगावात महाअधिवेशन होत आहे. बेळगावच्या वॅक्सिन डेपो मैदानात उद्या महाअधिवेशन होणार आहे. पण या महाअधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर संबंधित परिसरात कर्नाटक सरकारकडून उद्या सकाळी ७ वाजेपासून संध्याकाळी ५ वाजेपर्यंत संचारबंदीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. तसेच कर्नाटक सरकारकडून वॅक्सिन डेपो मैदानाच्या परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यामुळे मराठी भाषिकांची ही एकप्रकारे गळचेपी केली जात असल्याचा आरोप केला जातोय. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या महामेळाव्यास कर्नाटक सरकारने परवानगी नाकारली आहे. तसेच या महामेळाव्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त वॅक्सिन डेपो मैदानात तैनात करण्यात आला आहे. मराठी भाषिक एकत्र जमू नये याची खबरदारी पोलिसांकडून घेतली जात आहे. तर दुसरीकडे मराठी भाषित जनतादेखील आपल्या भूमिकेवर ठाम आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते महामेळावासाठी आग्रही आहेत. त्यामुळे संबंधित परिसरात तणाव वाढण्याची शक्यता आहे.ङ्गङ्गमहाराष्ट्र एकीकरण समिती दरवर्षी कर्नाटक विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी महामेळावा घेत असते. मात्र, यावर्षी कर्नाटक सरकारने मेळाव्याला परवानगी नाकारली आहे. त्यामुळे कर्नाटक सरकारची अशाप्रकारे दडपशाही सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. मराठी भाषिकांनी कर्नाटक सरकारला मोठा इशारा दिला आहे. कितीही संचारबंदी आणि पोलिसांना तैनात केलं तरी आम्ही वॅक्सिन डेपो मैदानात एकत्र जमणार असल्याचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी देखील ▶▶पान २ वर

### महाराष्ट्र एकीकरण समितीचा महाराष्ट्रातील नेत्यांवरही आरोप

बेळगावध्ये उद्या महाराष्ट्र एकीकरण समितीच्या वतीने होणाऱ्या महा मेळाव्याला कर्नाटक सरकारने परवानगी नाकारली आहे. शहरात काही ठिकाणी संचारबंदी देखील लागू केली आहे. मात्र ही बंदी झुगारून आम्ही कोणत्याही परिस्थितीत महामेळावा घेणार, असा इशारा महाराष्ट्र एकीकरण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. कर्नाटक सरकार संविधानानुसार चालत नसून गेल्या चार वर्षात सरकारकडून दडपशाही वाढल्याचा आरोप समितीने केला आहे. इतकंच नाही तर महाराष्ट्र सरकार देखील या प्रश्नाकडे गांभीर्याने बघत नसल्याबद्दल एकीकरण ▶▶पान २ वर

# उद्धव ठाकरेंचा राज ठाकरेंना धक्का

### मुंबईतील मनसेच्या शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



मुंबई, दि. ८ (वृत्तसेवा):- एकीकडे भाजप आणि मनसे युतीची जोरदार चर्चा सुरू असतानाच उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंना धक्का दिलाय. घाटकोपरमधील शेकडो कार्यकर्त्यांनी आज ठाकरेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. मातोश्रीवर पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम झाला. यामध्ये मनसेच्या माजी शाखा अध्यक्षांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसोबत ठाकरेंच्या शिवसेनेते प्रवेश केला. घाटकोपर पूर्वमधील मनसे पदाधिकाऱ्यांनी आज ठाकरेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. मातोश्री येथे उध्दव ठाकरे ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत घाटकोपर पूर्व विधानसभेतील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रभाग क्रं. १३३ चे माजी शाखा अध्यक्ष संतोष पिंगळे, माजी शाखा अध्यक्ष सुनील भोस्तेकर आणि प्रभाग क्रं. १२५ चे सतीश पवार ह्यांनी आपल्या सुमारे ३०० ते ४०० समर्थकांसह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात ▶▶पान २ वर

### उद्याची मुंबई आपली राहणार आहे का?

सर्वांचे शिवसेनेत आणि मातोश्रीत स्वागत आहे. आठ दहा दिवसांपूर्वी निकाल लागला आणि त्यानंतर ही तुम्ही शिवसेनेत येताय. जल्लोषात तुम्ही इकडे येताय, मात्र जे जिंकले त्यांच्याकडे जल्लोषच नाही. याचा अर्थ त्यांना त्यांच्या विजयावर विश्वास नाही. म्हणजे विजयात काहीतरी घपला आहे. ईव्हीएम मशीन घोटाळा आहे, बरेच घोटाळे आहेत, असे ठाकरे म्हणाले.

# कोपर्डी प्रकरणातील पीडितेच्या बहिणीच्या लग्नाला मुख्यमंत्री फडणवीसांची उपस्थिती



अहमदनगर, दि. ८ (वृत्तसेवा):-१३ जुलै २०१६ ला अहमदनगर जिल्ह्यातल्या कोपर्डी गावात एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणातील तीनही आरोपींना २९ नोव्हेंबर २०१७ ला फाशीची शिक्ष सुनावण्यात आली. या घटनेतील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात अनेक मोर्चे निघाले, आंदोलनं झाली. त्यानंतर या आरोपींना अखेर न्यायालयानं फाशीची शिक्षा सुनावली. दरम्याान महाराष्ट्राला हादरून सोडणाऱ्या या घटनेला आता आठ वर्ष पूर्ण झाली आहेत. आज पीडित मुलीच्या बहिणीचं लग्न होतं. या लग्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी हजेरी लावली. विवाहाचं निमंत्रण होतं, त्यामुळे कोपर्डीत आलो. वधू -वराला शुभेच्छा दिल्या. आज दोन कुटुंब एकत्र येत आहेत. सर्वजण वधू -वराला आर्शीवाद देण्यासाठी या विवाह सोहळ्याला आले आहेत. मी वधू वराला शुभेच्छा देतो असं फडणवीस यांनी यावेळी म्हटलं आहे. दरम्यान शनिवारी शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीची आकडेवारी सादर करत काही सवाल उपस्थित केले होते. काँग्रेसला ८० लाख मतं पडली तरी त्यांच्या सोळाच जागा आल्या आणि शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख मत पडली त्यांच्या ▶▶पान २ वर

# मराठवाड्यासाठी पंकजा मुंडेंची मुख्यमंत्र्यांकडे मोठी मागणी



मुंबई, दि. ८ (वृत्तसेवा):- राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने प्रचंड मोठा विजय मिळवला. यानंतर नुकतेच भाजपाच्या देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. दुसरीकडे एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. नव्या सरकारच्या शपथविधीनंतर माजी मंत्री आणि आमदार पंकजा मुंडे यांनी मराठवाड्यातील दुष्काळ, बेरोजगारी आणि स्थलांतरित कामगारांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी पंकजा मुंडे यांनी मांडलेले प्रश्न सोडवण्यासाठी विशेष लक्ष देणार असल्याचे सांगितले.

### पंकजा मुंडे यांची पोस्ट

भाजपाच्या विधान परिषदेच्या आमदार पंकजा मुंडे यांनी आज मुंबईत देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत, मुख्यमंत्री झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्यानंतर एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये पंकजा मुंडे म्हणाल्या, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन अभिनंदन केले. यावेळी त्यांच्याशी मराठवाड्यातील दुष्काळ निर्मूलन आणि बेरोजगारी यासारख्या मुद्द्यांवर चर्चा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या मागास भाग आणि स्थलांतरित कामगारांच्या समस्यांकडे विशेष लक्ष देणार असल्याचे आश्वासन दिले."

### मंत्रिमंडळात संधी मिळणार का?

विधानसभा निवडणुकीत भाजपाने सर्वाधिक जागा जिंकल्या असल्याने मंत्रिमंडळातही त्यांना जास्त जागा वाट्याला येणार आहेत. त्यामुळे भाजपाच्या अनेकांनी मंत्रिमंळात संधी मिळावी म्हणून प्रयत्न सुरू केले आहेत. अशात यापूर्वीही मंत्री राहिलेल्या पंकजा मुंडे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात स्थान मिळणार का याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. त्यामुळे पंकजा मुंडे पुन्हा मंत्री होणार का, हे पाहणे औत्सुकाचे ठरणार आहे.

# जनतेने आता विकास कामावर लक्ष ठेवावे-ॲड.देशमुख



बीड, दि.८ (मराठवाडा पत्र न्युज):- महाराष्ट्र राज्यामध्ये निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्ये कधी नाही तेवढा पैसा खर्च होताना जनतेने पाहिला. आता हा पैसा परत काढण्यासाठी राजकीय चळवळ उभी राहील. त्यामुळे सामान्य जनतेने आता आपापल्या भागातील विकास कामे होतात का ? याकडे लक्ष केंद्रित करावे. त्या त्या परिसरातील चांगल्या कार्यकर्त्यांची फळी उभी करून विकास काम चांगल्या दर्जाचे करून घेऊन देश उभारणीच्या कार्याला हात लावावा, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे. एका छोटेखानी कार्यक्रमात ते कार्यकर्त्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. राज्यातील विधानसभेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. त्यानंतर एक शपथविधी कार्यक्रम झाला. आणखी अनेक शपथविधीचे कार्यक्रम होतील. प्रत्येक नागरिकाला आता आपापल्या परिसरातील विकास कामाकडे लक्ष देण्याची वेळ आलेली आहे. जोपर्यंत नागरिक दक्ष होत नाही, तोपर्यंत विकास काम चांगल्या दर्जाचे होणार नाही. बोकाळलेला भ्रष्टाचार थांबवणे, हे प्रशासन यंत्रणेला शक्य होईल, असे चित्र दिसत नाही. कारण प्रशासनातील भ्रष्ट प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चाललेल्या आहेत. गप्पा मारताना समाज परिवर्तन ▶▶पान २ वर

# राजस्थानी विद्यालयात "गुड टच बॅड टच" जनजागृती संवाद



बीड, दि. ८ (मराठवाडा पत्र न्युज):- शहरातील राजस्थानी विद्यालय येथे विद्यार्थ्यांसाठी "गुड टच बॅड टच" जनजागृती संवादाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त उपस्थित राहुन सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. आई तुळजा भवानी सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या माध्यमातून हा जनजागृती संवाद उपक्रम सुरू आहे. याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक, दामिनी पथकाच्या प्रमुख मा. वर्षा व्हगाडे यांच्यासह राजस्थानी सेवा समाज संस्थेचे सचिव रामेश्वरजी ▶▶पान २ वर

# द्वारकाधिशचा सुदामा गेला!

## वैभव वैद्य यांचे दु:खद निधन



बीड, दि. ८ (मराठवाडा पत्र न्युज) :- द्वारकाधीश मित्र मंडळाचे विश्वस्त एक धाडसी युवा नेतृत्व म्हणून सर्वत्र परिचित असलेले वैभव विनायक वैद्य यांचे अल्पशा आजाराने मुंबई येथील ज्यूपिटर हॉस्पिटल मध्ये उपचार घेत असताना रविवार दिनांक ८ डिसेंबर २०२४ रोजी पहाटे ४:३० वाजता दुःखद निधन झाले. मृत्यू समयी ते अवघ्या ३७ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी ▶▶पान २ वर




# मुंडेना 'धस'का

## वीच मुंडे हू विल पालकमंत्री



क्रॉसलाईन

महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकांचे मताधिक्य घेऊन पवारांचे वजीर सत्ताधारी दोन्ही पक्षात वजन राखून असल्याने एकीकडून संधी आणि एकीकडून सवलत मिळण्याची शक्यता असल्याने ते दुसऱ्या सत्तेत तिसऱ्यांदा पालकमंत्री होण्याची दाटवाट घटमुट शक्यता आहे. तरीही, ताईचे कार्यकर्ते पक्ष संधी देईल हा कयास लावताना कमालीचे उत्साही दिसत आहेत, यात पंकजा मुंडे यांनी विरोध करून ( धस यांच्या भाषणाचा रोख लक्षात घेऊन ) सुरेश धस थेट पाऊण लाखाने निवडून आले आहेत. पाचव्यांदा आमदार होणारे धस देखील नामदार होण्याचे नैतिक आणि नैसर्गिक मनसुबे बांधून आहेत, पंकजांच्या जिल्ह्यात मराठा सरदार नागपुरच्या गादीला हवाच असेल तेव्हा, परिषदेची आडकाठी आलीच तर धसांची वाट मोकळी होईल, सोबतच धनंजय मुंडे यांची देखील. बहीण-भावात नात्याची ओढ कायम राहील मात्र राजकीय चढाओढ परळीला चुकणार नाही . भाऊ आणि ताई म्हणजे स्वतंत्र स्वतची यंत्रणा असलेले लोकनेते, जो कुणी पालकमंत्री होईल त्याचे स्वतंत्र कारभारी वर्गवारी असलेले सरदार असलेले नेते, त्यामुळे पालकमंत्री पद दोघांत असे होऊच शकत नाही त्यामुळे मुंडे आणि मुंडे असे दोन वर्ग स्पर्धा म्हणून नाही मात्र पक्ष म्हणून पडतीलच. तेव्हा परस्परांच्या यंत्रणा मधील कार्य करते आपलाच माणूस पालकमंत्री हवा असा रोख लाऊन आहेत. पंकजा मुंडे यांना अगोदर मंत्री व्हावे लागेल नंतर पालकमंत्री, भूपेंद्र यादव यांचे अनुमोदन असल्याने त्या मंत्री होतील हा कयास तार्किक आहे मात्र त्या पालकमंत्री होतील यास राष्ट्रवादीचे वजीर आणि भाजपचे पाऊण लाखाचे आमदार सुरेश धस हे रोधक असतील आणि नैसर्गिक रित्या ते आडवे असतील . धनंजय मुंडे यांचे सामान्य मतदारात असलेले कसब त्यांच्या पक्षात असलेले त्यांचे वजन स्थिर आणि अधिक आहे तुलनेने बहिणीच्या, कारण भाजप आणि पंकजा मुंडे हे फारसे सयुक्तिक ▶▶पान २ वर



# 'ममीफाइड' मध्यमवर्ग!



चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत भारताचा सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) वाढीच्या दराने नीचांक गाठला. या तिमाहीत आपली अर्थव्यवस्था फक्त ५.४ टक्क्यांनी वाढली. केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार अनंत नागेश्वरन यांनीही या घसरणीची दखल घेतली आणि चिंता व्यक्त केली. ही बाब आवर्जून नमूद केली. नपेक्षा विचारांध लोक 'देशद्रोही' माध्यमांस बोल लावते. या घसरणीमागील प्रमुख कारण 'मागणीतील घट' असे अधिकृतरीत्या दिले गेले. म्हणजे जी बाब 'लोकसत्ता' गेले काही महिने सातत्याने मांडत होता तीवर अखेर केंद्रानेच शिक्कामोर्तब केले. अर्थव्यवस्था 'तणावपूर्ण शांतता' अनुभवत आहे. सरकार काहीही म्हणो. ना नागरिक खिशातील पैसा बाहेर काढू इच्छितात ना उद्योगपती. मालाला उठावच नसेल तर उत्पादक वस्तुनिर्मिती तरी का करतील. त्यात चलनवाढ. म्हणजे नागरिकांसाठी हे दुहेरी संकट. हाती मोजकाच पैसा; पण चलनवाढीमुळे त्या पैशाचे मोल मात्र घसरते, अशी स्थिती. यात आपल्या कर्तव्यास जागून आणि केंद्राचा धाक झुगारून रिझर्व्ह बँकेने व्याज दर वाढवलेच तर हे सध्याचे दुहेरी संकट तिहेरी होणार. वास्तविक अशी आर्थिक स्थिती ही सत्ताधाऱ्यांस मारक ठरते. महागाई, मध्यमवर्गाचा रोष आणि निवडणुकांचे निकाल यांचा थेट संबंध असतो असे शहाण्या काळातील निवडणुकांचा इतिहास दर्शवतो. पण हा शहाणा काळ कधीच मागे पडला. सद्या:स्थितीत घामाच्या कमाईचे खाणाऱ्या मध्यमवर्गाच्या राजकीय संतापावर एक चांगला उतारा सत्ताधीशांना गवसला असे महाराष्ट्रातील निवडणूक निकालांनंतर म्हणता येईल. या मध्यमवर्गास खुंटीवर टांगणे हा तो उतारा. त्याचे दृश्य रूप म्हणजे कमावत्या वर्गाने भरलेल्या कर रकमेवरचे सरकारी औदार्य. हे पक्ष निरपेक्ष असते. म्हणजे झारखंडातील त्या राज्याच्या नावाचा मुक्ती मोर्चा असो वा महाराष्ट्रातील भाजप-शिंदेसेना-अजित पवार यांची राष्ट्रवादी ही नव-भगवी युती असो. सगळे एका माळेचे मणी. या सर्वपक्षीय सत्ताधाऱ्यांच्या धनवाटप योजनेचे नाव तेवढे बदलते. मध्य प्रदेशातील 'लाडली बहना' महाराष्ट्रात 'लाडकी बहीण' होते तर झारखंडात ती 'मेरी मय्या' बनून पधारते. पद्धत तीच. फुकट पैसे वाटप. अलीकडच्या या धनवाटपाची सुरुवात करण्याचे श्रेय सोनिया गांधी यांच्याकडे जाते. मनमोहन सिंग सरकार असताना त्यांच्या विरोधास डावलून सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखालील 'राष्ट्रीय सल्लागार परिषद' या यंत्रणेने पंतप्रधानांस 'मनरेगा' सुरू करायला लावली. तिचा उद्देश गरिबांहाती थेट रक्कम देता यावी, हाच होता. त्या वेळी गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी तिचे वर्णन 'भ्रष्टाचाराचा मेरुमणी' असे केले असले तरी पंतप्रधानपदी आल्यावर मोदी यांनी सोनिया गांधी यांचेच अनुकरण केले. ज्या मनमोहन सिंग यांच्यावर 'मनरेगा'साठी करदात्यांच्या पैशाची उधळपट्टी करत असल्याचा आरोप विरोधक करत होते त्याच 'मनरेगा'चे अनुदान मोदी यांनी वाढवले. म्हणजे मध्यमवर्गाकडून जमा होणाऱ्या कर उत्पन्नातील अधिक मोठा वाटा गरिबांहाती मोदी यांनी दिला. सोनिया गांधी यांच्या या सरकारी दानशूरतेचा फायदा मनमोहन सिंग सरकारला २००९ सालच्या निवडणुकांत झाला. विजयाची कसलीही अपेक्षा नसलेले, डाव्यांनी पाठिंबा काढून घेतलेले अधांतरी मनमोहन सिंग सरकार त्या निवडणुकीत पुन्हा एकदा निवडले गेले. त्यानंतरच्या निवडणुकांत कथित भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे सिंग सरकार असा काही रमणा भरवू शकले नाहीत. तथापि त्यांचा २००९ सालच्या फेरविजयाचा धडा नरेंद्र मोदी यांनी आवर्जून लक्षात ठेवला आणि २०१९ साली त्यांच्या फेरनिवडणुकीत 'पीएम किसान योजना' आणून शेतकऱ्यांच्या हातात थेट रेवडी देत पुन्हा एकदा सत्ता मिळवली. त्या वेळी 'बालाकोट'चाही परिणाम झाला; हे खरे. पण त्या राष्ट्रप्रेमाच्या लाटेचा पाया या रेवडीने रचलेला होता, हे दुर्लक्षित करता येणार नाही. या रोख रकमांच्या रेवड्या आणि रमणे हे निवडणुकीच्या राजकारणात किती उपयुक्त ठरू शकतात, हे यानंतरच्या काळात दिसून आले. 'आम आदमी पक्षा'चे दिल्ली आणि पंजाब येथील विजय हे या निरीक्षणांस पुष्टी देतात आणि ताज्या निकालांमुळे तर त्यास सिद्धान्ताचे स्वरूप येते. म्हणजेच उगाच विचारधारा वगैरेंस महत्त्व देणारा मध्यमवर्ग या काळात किती अधिकाधिक बावळट ठरत गेला हे हा सर्व तपशील नमूद करण्याचे महत्त्वाचे कारण. या मध्यमवर्गास खुलवण्यासाठी धर्म, राष्ट्रवाद, राष्ट्रतेज इत्यादी शब्दसेवा पुरेशी असते. त्यास मशिदींच्या खाली शिवलिंग असल्याचा दावा करणाऱ्या 'मियाँकी तोडी' या 'रागाचे' पार्श्वसंगीत असले तर सोन्याहून पिवळे. मग शेवग्याच्या शेंगा, लसूण आदींचे दर प्रतिकिलोस ४०० रुपयांच्या वर जावोत, कांद्याने शंभरी पार करो, वस्तू-सेवा कराने कितीही पिळवणूक करो वा आयकरात अवाच्या सवा वाढ होवो आणि या बदल्यातील सेवा शून्यवत होवोत! कशाचाही काही फरक पडत नाही. शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णास भूल दिल्यानंतर त्याची जी अवस्था होते त्याच अवस्थेत या मध्यमवर्गास राखता येते हे अनेक निवडणूक निकालांतून सिद्ध होते. यातील मोठा वर्ग नोकरदार. त्यामुळे तो हमखास प्रामाणिक करदाता! त्यास कर वाचवण्यासाठी कोणतेही मार्ग नसतात. त्यामुळे त्यास प्रामाणिक राहण्याखेरीज पर्याय नसतो. त्याच्या वरचे श्रीमंत कोणालाच मोजत नाहीत. किंवा खरे तर सर्व पक्षांस हवे ते (हवे तितकेही) 'मोजतात'. त्यामुळे सत्ताधारी पक्ष कोणताही असो. त्यांची कंत्राटे, त्यांचा व्यवसाय विस्तार, त्यांची उत्पन्न वाढ आदी कशावर तसूभरही फरक पडत नाही. त्यातला एखादा अधिक लाडका असतो आणि सत्ताबदलामुळे फार फार तर हा लाडका बदलू शकतो, इतकाच काय तो बदल. बाकी या वर्गास सत्ताधारी कोण याची अजिबात फिकीर नसते. राहता राहिला अर्थव्यवस्थेत अत्यंत तळास असलेला गरीब वर्ग. त्यास रोजगाराची भ्रांत असते आणि ग्रामीण भागातील असेल तर शेतमालाच्या दराची चिंता. हे दोन्हीही देता आले नाही तरी हा वर्ग आपल्याकडे 'वळवण्याचा' सोपा मार्ग सरकारला गवसलेला आहे. तो म्हणजे हे निवडणूक-पूर्व रमणे आणि रेवड्या. म्हणजे विविध कल्याणकारी योजना. सध्याच्या 'लाडकी बहीण' योजनेसाठी सरकारच्याच प्राथमिक अंदाजानुसार किमान ४६ हजार कोटी रु. लागतील. ती रक्कम १५०० रु. वरून २१०० रु. करण्याचे आश्वासन सत्ताधाऱ्यांचे आहे. त्यास वाटाण्याच्या अक्षता लावल्या जातील असा 'लोकसत्ता'चा कयास असला तरी समजा ही रक्कम खरोखरच वाढवली तर हा ४६ हजार कोटी रुपयांचा खर्च आणखी दहा-पंधरा हजार कोटींनी वाढेल. आपले राज्य सरकार आरोग्यावर खर्च करत असलेली रक्कम २० हजार कोटी रुपये इतकीही नाही आणि संपूर्ण राज्याचा शिक्षण अर्थसंकल्प जेमतेम एक लाख कोटी रुपयांचा आहे हे लक्षात घेतल्यास 'लाडक्या बहिणीं'वर होणाऱ्या दौलतजादाचे अर्थगांभीर्य लक्षात येईल. तो स्पष्ट आहे. धनाढ्यांस हवे ते मिळणार आणि मध्यमवर्गाच्या कर-उत्पन्नातून गरिबांचे लाभार्थीकरण होत राहणार. गलेलठ्ठ धनाढ्य वर्ग राजकीय पक्षांना निवडणुकीस देणग्या देतो तर मध्यमवर्ग या रेवड्या-आणि-रमणे यांचा खर्च उचलतो. पण सर्वात उपेक्षित मध्यमवर्ग. पदरात काहीही पडत नसले तरी, सत्ताधीश जुन्या भ्रष्टांना पावन करून घेणारे असले तरी हा वर्ग फक्त 'आपल्या' (?) विचारांचे सरकार आले यातच खूश. इंग्रजीत 'ममीफिकेशन' असा शब्दप्रयोग आहे. म्हणजे चेतनाशून्यता. एकेकाळी विचारजागरूक असलेला हा वर्ग सध्या 'ममीफाइड' झाल्याचा निष्कर्ष कोणी काढल्यास तो अयोग्य ठरवता येणार नाही.

# खा.सोनवणे व खा.लंके यांनी विशेष प्रयत्न केल्यास घाटनांदूर-श्रीगोंदा रेल्वे मार्गाचा प्रलंबित प्रश्न निश्चित मार्गी लागू शकेल



अंबाजोगाई, दि. ८ (मराठवाडा पत्र न्युज): - मागील अनेक वर्षा पासून प्रस्तावित असलेल्या घाटनांदूर श्रीगोंदा या अंबाजोगाई-केज-मांजरसुंबा मार्गे अहिल्या देवी नगर जिल्ह्यातून जाणाऱ्या रेल्वे मार्गाला गती मिळण्या साठी बीडचे खासदार बजरंग सोनवणे व अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी विशेष प्रयत्न केल्यास हा प्रलंबित प्रश्न निश्चित मार्गी लागणार आसून हा प्रकल्प दोन्ही जिल्ह्याच्या विकासासह दळणवळणाच्या व रेल्वे खात्याला आर्थिक उत्पन्न देणारा ठरणार आहे. मागील अनेक वर्षा पासून घाटनांदूर-श्रीगोंदा या रेल्वे मार्गासाठी या पंचक्रोशीतील लोक आग्रही असून या रेल्वे मार्गाच्या मागणी साठी भाजपचे एकमेव निष्ठावंत कार्यकर्ते भारत पसारकर यांनी अनेक वेळा स्वत:च्या हस्ताक्षरात केंद्र सरकार कडे पाठपुरावा केलेला असून माजी खासदार डॉ प्रीतमताई मुंडे यांच्या कडे अंबाजोगाई जनाग्रह रेल्वे संघर्ष समितीने ही पाठपुरावा केलेला आहे. हा रेल्वेमार्ग पूर्ण व्हावा यासाठी तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू अनुकूल होते. या रेल्वेमार्गामुळे अंबाजोगाई, केज, नेकनूर, मांजरसुंबा, पाटोदा, जामखेड या सह अनेक गावे रेल्वेमार्गावर येणार असून २६५ किमी अंतराचा मार्ग पूर्ण झाला तर या परिसरातील नागरिकांना दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत सोयीचे होणार आहे. केंद्रीय रेल्वे मंत्रालयाच्या वतीने सन २०१५ मध्ये अर्थसंकल्प सादर करताना तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी घाटनांदूर (जि. बीड) ते श्रीगोंदा (जि.अहमदनगर) हा नवीन रेल्वेमार्ग जाहीर करून या मार्गाचे सर्वेक्षण करण्यासाठी ३४ लाख रुपयांची तरतूद जाहीर केली होती. त्यानुसार पुढील आठ महिन्यांच्या कालावधीत सन २०१६ मध्ये रेल्वे प्रशासनाने या नियोजित रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणाचे काम घाटनांदूर रेल्वेस्थानकातून सुरू केले. घाटनांदूर व अंबाजोगाई शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतात खुंटे रोवण्यात आले होते. प्रशासनाची ही सतर्कता पाहिल्याने नागरिकांना हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असे वाटत होते. मात्र, पुढे हे काम रखडले ते आतापर्यंत रखडलेले आहे. घाटनांदूर, अंबाजोगाई, लोखंडी सावरगाव, केज, नेकनूर, मांजरसुंबा, लिंबागणेश, पाटोदा, जामखेड, दौंड किंवा श्रीगोंदा रोड असा हा मार्ग तेव्हा प्रस्तावित करण्यात आला होता. हा रेल्वेमार्ग बीड व अहमदनगर जिल्ह्यातील जनतेच्या विकासाची पर्वणी ठरून आर्थिक सुबत्ता आणणारा ठरू शकतो. बीड जिल्ह्यात उद्योगधंदे वाढीस लागावेत व जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा, केज हे तालुके रेल्वेमार्गाने जोडले जावेत या उद्देशाने या रेल्वेमार्गाची मागणी पूर्णत्वाकडे जाणार आहे. परंतु हा रेल्वेमार्ग परळी-अंबाजोगाई-केज-नेकनूर-मांजरसुंबा-पाटोदा जामखेड-अहमदनगर ही अधिक प्रवासी अधिभार देणारी गावे वगळून कमी अधिभार देणाऱ्या परळी-तेलगाव-वडवणी-बीड-अहमदनगर अशा प्रकारे बनवण्यात येत आहे. त्यामुळे आता सन २०१६ मध्ये झालेल्या सर्वेक्षणाच्या आधारे घाटनांदूर ते श्रीगोंदा या रेल्वेमार्गाचे काम मार्गी लागावे, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

# जानेवारीपासूनच लाडक्या बहिणींना २१०० रूपये द्या

## सुप्रिया सुळे यांची मागणी



मुंबई, दि. ८ (वृत्तसेवा):-'लाडक्या बहिणींना जानेवारी महिन्यात २१०० रूपये द्या, हा डिसेंबर महिना संपत आला आहेच. लाडक्या बहिणींच्या खात्यात जानेवारीपासूनच २१०० रूपये मासिक रक्कम द्यायला सुरूवात करा'. अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. लाडकी बहीण योजना महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरली. युतीचं सरकार आल्यानंतर लाडक्या बहिणींना १५०० नसून २१०० मासिक रक्कम खात्यात जमा करून देऊ, असं आश्वासन युती सरकारनं दिलं होत. मात्र, अर्जांची छाननी करून आणि निकषात बसणाऱ्या महिलांनाच ही रक्कम देण्यात येईल असं सांगण्यात आलं. त्यामुळं कुणाचा अर्ज बाद होणार? कुणाला पैसे मिळणार? असे अनेक प्रश्न महिलावर्गामध्ये उपस्थित होत आहे. अशातच या योजनेबाबात सुप्रिया सुळे यांनी लाडक्या बहिणींना जानेवारी महिन्यात २१०० रूपये द्या अशी मागणी केली. त्यामुळे जानेवारी महिन्यात तरी बहिणींच्या खात्यात पैसे जमा होणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

### लाडक्या बहिणींना ३ हजार रूपये द्या

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे महायुती सरकारच्या योजनेबद्दल भाष्य केलं. 'लाडक्या बहिणींना १ जानेवारीपासून २१०० देण्यात यावेत. आता नवीन वर्ष सुरू होईल. डिसेंबर महिना काही दिवसांमध्ये संपेल. शक्य असेल तर, डिसेंबर किंवा १ जानेवारीपासूनच लाडक्या बहिणींच्या खात्यात २१०० मासिक रक्कम जमा करा. आम्ही तर म्हणतो ३ हजार रूपये द्या. कारण आम्ही सत्तेवर आलो असतो, तर महिन्याला ३ हजार रूपये देणार होतो.' असा टोलाही सुप्रिया सुळे यांनी लगावला आहे.

# मराठा फाउंडेशनच्या मराठवाडा प्रदेश उपाध्यक्षपदी बालासाहेब फपाळ पाटील यांची निवड



बीड, दि.८ (मराठवाडा पत्र न्युज):-बीड येथे मराठा फाउंडेशन सामाजिक संघटनेत काम करण्याची इच्छा लक्षात घेऊन मराठा समाजावर मराठा विद्यार्थ्यावर ज्या ठिकाणी अन्याय होईल तिथे धावून जाऊन आपण न्याय मिळवून देऊ अशी अपेक्षा आहे तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्नशील राहाल याकरता मराठा फाउंडेशन सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माननीय श्री बापूसाहेब बापू जाधव यांच्या व महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस श्री विजय सिताराम पोकळे यांच्या मान्यतेनुसार श्री बालासाहेब दामोधर फपाळ पाटील यांची मराठा फाउंडेशन सामाजिक संघटनेच्या मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे दिनांक ०७/१२ /२०२४ शनिवार रोजी बीड येथील जालना रोड वरील पंजाब इंटरनॅशनल बँकेच्या खाली माऊली मल्टीसर्विस कार्यलय येथे सर्व पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये निवड करण्यात आली तसेच या पदावर नियुक्ती झाल्यामुळे मराठा फाउंडेशनची ध्येय आणि धोरणाचा तसेच माननीय श्री अध्यक्ष बापूसाहेब बापू जाधव यांच्या विचारांचा अधिक जोमाने प्रचार व प्रसार कराल अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी गेवराई तालुक्यातील रांजणी येथील सरपंच कु भाग्यश्री आसाराम रोडगे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी रोजगार रोजगार सेलचे जिल्हाध्यक्ष माननीय विजय दादा पोकळे मराठवाडा अध्यक्ष सतीश कुमार सोळंके शंकर सुस्कर.मनिषा सुस्कर वैभव पोकळे आदी उपस्थित होते यांनी श्री बालासाहेब फपाळ पाटील यांना मराठा फाउंडेशनचे नियुक्तीपत्र देऊन शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# "मोठ्या पक्षांची मंत्रिपदे नंतर निश्चित करा, आधी", सदाभाऊ खोत यांनी महायुतीच्या नेत्यांकडे केली 'ही' मागणी

मुंबई, दि. ८ (वृत्तसेवा):- महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं आहे. मुख्यमंत्री पदाची शपथ देवेंद्र फडणवीस यांनी घेतली, तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. खरं तर विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर महायुतीला सरकार स्थापन करण्यात तब्बल एका आठवड्यापेक्षा जास्त कालावधी लागला. त्यानंतर सरकार स्थापन झालं. आता अद्याप मंत्रिमंडळाचा विस्तार देखील बाकी आहे. त्यामुळे महायुतीच्या मंत्रिमंडळाचा विस्तार कधी होणार? याकडे अनेकाचं लक्ष लागलं आहे. तसेच मंत्रिमंडळाच्या विस्तारात महायुतीतील तिन्ही पक्षांना किती आणि कोणती कोणती मंत्रिपदे देण्यात येतात? हे देखील महत्वाचं ठरणार आहे.



यातच काही मंत्रिपदावरून महायुतीतील पक्षात रस्सीखेंच सुरु असल्याची चर्चा आहे. आता यातच रयत क्रांती संघटनेचे प्रमुख तथा आमदार सदाभाऊ खोत यांनी महायुतीच्या नेत्यांकडे मोठी मागणी केली आहे. 'मोठ्या पक्षांची मंत्रिपदं नंतर निश्चित करा, आधी छोट्या घटक पक्षांची मंत्रीपदं निश्चित करा', असं सदाभाऊ खोत यांनी म्हटलं आहे. ते एबीपी माझा या वृत्तवाहीनीशी बोलत होते.

## सदाभाऊ खोत काय म्हणाले?

"महायुती बरोबर आम्ही २०१४ पासून आहोत. आम्ही नक्कीच अनेक संकटांचा मुकाबला करत आलोत. आम्ही विस्तापितांचं नेतृत्व करतो. त्यामुळे माझीही इच्छा आहे की, लढणाऱ्या कार्यकर्त्याला संधी (मंत्रिपद) मिळावी. कारण विस्तापितांना लढायला बळ मिळेल. तसेच याचा विचार महायुतीने करावा, अशी अपेक्षा आम्ही करत आहोत. आम्ही प्रामाणिक काम केलं, आता पाहू ते काय निर्णय घेतात", असं सदाभाऊ खोत यांनी म्हटलं आहे. खोत पुढे म्हणाले की, "एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनाचा खासदार आम्ही निवडून दिला. आता इकडे आम्ही भाजपाचे घटक पक्ष आहोत. त्यामुळे पैरा फेडला तर आनंद आहे. कारण विस्तापितांना कधीही संघर्षच असतो. माझा संघर्ष हा सत्तेसाठी नव्हता. माझा संघर्ष हा सर्वसामान्य माणसांना न्याय मिळावा यासाठी होता. आता मूठभर धान्य त्यांनी आमच्या सुपात टाकायचं की नाही? हा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा आहे. माझं तर स्पष्ट मत आहे की, त्या तिघांनी आधी घटक पक्षांची मंत्रिपदे बाजूला काढावी, मग मंत्रिपदाचे वाटप करावं. मात्र, निवडणूक झाली की हे आम्हाला विसरून जातात", असं सदाभाऊ खोत यांनी म्हटलं.

## पान १ वरून

### सीमा वादाचे...

मैदान परिसरात येऊन पाहणी केली आहे. मेळाव्यासाठी कशाप्रकारे नियोजन करता येईल याची खात्री पदाधिकाऱ्यांनी केली आहे. त्यामुळे उद्या या महामेळाव्याला परवानगी दिली जाणार का? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### महाराष्ट्र एकीकरण समितीचा...

समितीच्या पदाधिकाऱ्यांनी खंत व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील नेते आता या प्रश्नाकडे ढुंकून सुद्धा बघत नाहीत, असा गंभीर आरोप देखील या वेळेस एकीकरण समितीने केला आहे.

### कोपर्डी प्रकरणातील पीडितेच्या...

पेक्षा एक लाख कमी मात्र त्यांच्या ५७ जागा आल्या असं शरद पवार यांनी म्हटलं होतं, यावर देखील यावेळी फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.‘शरद पवार यांनी जनतेचे ऐकावे, कार्यकर्त्यांचे आणि खोटं सांगणाऱ्या कार्यकर्त्यांचं ऐकू नये. शरद पवार हे ज्येष्ठ नेते आहेत, त्यांनी पराभव स्विकारला पाहिजे. पवार साहेबांनी जनतेचं मत स्विकारलं पाहिजे. लोकशाही प्रक्रियेवरून लोकांचा विश्वास उडेल, अशा प्रकारची वक्तव्य किमान शरद पवार यांनी तरी करू नये. ५० वर्षांपेक्षा जास्त प्रदीर्घ अनुभव असेलेले ते नेते आहेत. आशा परिस्थितीमध्ये संयमानं वागायचं असतं आणि पराभव स्विकारायचा असतो. ते कदाचित त्यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांच्या दबावातून असं म्हणत असतील, पण त्यांना मनातून माहिती आहे, पराभव नेमका काशामुळे झाला? असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### व्दारकाधिशचा सुदामा...

## पान १ वरून

सायंकाळी ५.३० वाजता बीड येथील अमरधाम स्मशानभूमी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. बीड शहरातील धोंडीपुरा जव्हेरीगल्ली भागात राहणारे वैभव विनायक वैद्य हे बीड जिल्हा मराठी पत्रकार संघ बीडचे सचिव व बीड शहरातील जेष्ठ संपादक पत्रकार विनायक वैद्य यांचे चिरंजीव होते. वैभव वैद्य हे द्वारकाधीश मित्र मंडळामार्फत व परशुराम गुरखुदे यांचे अत्यंत विश्वासू म्हणून युवकात प्रसिद्ध होते. कोणत्याही गरजवंतांच्या कामाला धाडसाने धावून जाणारे नेतृत्व म्हणून वैभव वैद्य यांची वेगळी ओळख होती. सर्व जाती धर्मातील सामाजिक आणि धार्मिक कार्यामध्ये त्यांचा सक्रिय उत्स्फूर्त सहभाग असायचा. छत्रपती शिवाजी महाराज जयंती, स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती, गणेश उत्सव, राम जन्म उत्सव व इतर अनेक धार्मिक कार्यात ते विविध उपक्रमांच्या माध्यमातून उस्फूर्तपणे सहभाग घेत असत. युवकांचे मोठे नेटवर्क संघटित करून द्वारकाधीश मित्र मंडळाच्या माध्यमातून त्यांनी परशुराम गुरखुदे यांच्या पाठीशी मोठी ताकद उभा केली होती. युवक वर्गात त्यांची एक वेगळी छबी आणि दरारा होता. मागील आठवड्यामध्ये वैभव वैद्य यांना अचानक अस्वस्थ्य वाटू लागल्याने बीडच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र प्रकृती जास्त खालवल्याने त्यांना ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांची प्रकृती जास्तच बिघडल्याने प्राणज्योत मावळली. त्यांच्या दुःखद निधनाच्या वृत्तावर विश्वासच बसत नाही. एक हरहुन्नरी, हजरजबाबी, निर्णय घेण्याची तात्काळ क्षमता असलेला धाडसी युवा नेता अशा पद्धतीने अचानक जाईल असे स्वप्नातही वाटत नाही. वैभव वैद्य यांच्या अचानक निधनाने द्वारकाधीश मित्रपरिवार मात्र पोरका झाला आहे. त्यांच्या पश्चात वडील पत्रकार विनायक वैद्य, आई, पत्नी, एक मुलगा, चार बहिणी, मेव्हणे, द्वारकाधीश असा मोठा परिवार आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. वैद्य कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.

### जनतेने आता विकास...

## पान १ वरून

आणि देशाच्या उभारणीच्या मारायच्या. मात्र प्रत्यक्ष काम करताना भ्रष्टाचार रोखण्यासाठी पुढे यायचे नाही. ही प्रवृत्ती आता शासन आणि प्रशासनात वाढलेली आहे. सामान्य नागरिकांच्या गरजा अत्यंत कमी असतात. त्या गरजा पूर्ण करणे ही शासनाची जबाबदारी आहे. मात्र नागरिक जेव्हा आपल्या अधिकाराची मागणी करतो, त्याच वेळेला हक्काची देखील मागणी केली जाते. अनेक योजना हक्काने मागण्याचा अधिकार नागरिकांना आहे. मात्र आता घटनेने दिलेल्या हक्क आणि अधिकारा बरोबर नागरिक म्हणून देखील आपले जे कर्तव्य आहे, ते निभावण्याची वेळ आली आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने दक्ष राहून आपले गाव, तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर कोणकोणत्या योजना येत आहेत, त्या जनतेपर्यंत पोहोचतात का ? आपला हक्क आपल्या पदरी पडत आहे का ? या सर्व मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक गावातील कार्यकर्त्यांनी तरुणांची एक फळी निर्माण करून सर्व समावेशक असे काम करणे गरजेचे झाल्याचे मत व्यक्त करत भ्रष्ट लोकांवर अंकुश ठेवण्यासाठी जनतेने पुढे येण्याचे आवाहन ॲड. अजित देशमुख यांनी केले आहे.

### राजस्थानी विद्यालयात...

कासट सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास ॲड. सुलाखे, राजस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक कसबे सर, उप मुख्याध्यापक लाहोटी सर, सोहनी सर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व आई तुळजाभवानी सामाजिक प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते. अद्याप बीड शहरातील १० शाळेत हा संवाद उपक्रम संपन्न झालेला आहे. याप्रसंगी सुरु असलेल्या स्तुत्य उपक्रमाबद्दल प्रतिष्ठान च्या सर्व सदस्यांनाही शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरून

### उध्दव ठाकरेंचा...

प्रवेश केला. उध्दव ठाकरेंनी शिवबंधन बांधून त्यांचे पक्षात स्वागत केले. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्ती करण्यात आलेल्या महिला निरीक्षकांची बैठक मातोश्री येथे पार पडली.

### मुंडेना धस का...

वाटत नाही. कित्येक साध्या साध्या माणसांना आमदार करून झाल्यावर कुठे लोकनेत्या पंकजा मुंडे यांना आमदार केले ते देखील तोंडावरची विधान सभा लक्षात घेऊन . ताईने मराठवाड्यात अनेक सभा घेतल्या नाकारता येत नाही मात्र त्यांच्यावर युतीच्या उमेदवारांना पाडण्या साठी ओबीसी कार्ड खेळल्या असा आरोप आहे , गेवराई खेडकर, माजलगाव निर्मळ आणि आष्टीत धोंडे असे थेट मनसबदार केल्याची चर्चा आहे , बीड मध्ये देखील डॉ योगेश यांना जावई असा उल्लेख करून संदीप यांना मराठा मत मिळवून दिले या उलट डॉ योगेश जर अजित पवारांचे उमेदवार होऊन , दादांना मुख्यमंत्री करायचे म्हणून घडी ला मत द्या म्हटले गेले असते तर डॉ योगेश यांच्या संधी वाढून घाटावर चार मते वाढली असती, असा कयास या अर्थाने की, डॉ योगेश हे पंकजा यांचे उमेदवार होते, जर अजित पवारांचे म्हणून ते अधिक प्रबळ ठरले असते, असे म्हणणारा मोठा वर्ग पंकजा मुंडे यांच्या जावई वक्तव्याने संदीप यांना मराठा मंतदारात जावई म्हणून समोर आले आणि युतीचे डॉ योगेश पराभूत झाले असे लोक म्हणतात. इतर ठिकाणी पंकजा ताईने कमळाची बाग फुलवली मात्र बीडात धोंडा टाकल्याचे आरोप त्यांना बीडचे पालकमंत्री होऊन देईल असे अनेकांना वाटत नाही.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## महत्वाचे

## जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त अशोक शेजवळ यांची विद्यार्थिनीला आर्थिक मदत

**बीड ।** प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते माननीय श्री अशोक शेजवळ सर यांनी बीड तालुक्यातील श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आहेर चिंचोली शाळेतील विद्यार्थिनी आलिया मझहर सय्यद हिला अडीच हजार रुपये आर्थिक मदत केली. सामाजिक कार्यकर्ते मा. अशोक शेजवळ सरांनी बॅनर चा खर्च टाळून गोर गरीब विद्यार्थ्याला आर्थिक मदत केली पाहिजे याच भावनेतून ते विद्यार्थ्याला प्रत्येक वर्षी आर्थिक मदत करतात .यावेळी श्री नारायण विद्यालय मा. व उच्च मा. विद्यालयाच्या संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवरावजी काळे अण्णा , संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर,दीपक ढेंगे, प्राध्यापक अशोक घरत सर ,श्री मुरमुडे सर,श्री दामोदर काळे,सुमित कदम, यावेळी उपस्थित होते.

## जनतेने आता विकास कामावर लक्ष ठेवावे: ॲड. अजित देशमुख

**बीड ।** प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यामध्ये निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्ये कधी नाही तेवढा पैसा खर्च होताना जनतेने पाहिला. आता हा पैसा परत काढण्यासाठी राजकीय चळवळ उभी राहील. त्यामुळे सामान्य जनतेने आता आपापल्या भागातील विकास कामे होतात का ? याकडे लक्ष केंद्रित करावे. त्या त्या परिसरातील चांगल्या कार्यकर्त्यांची फळी उभी करून विकास काम चांगल्या दर्जाचे करून घेऊन देश उभारणीच्या कार्याला हात लावावा, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे. एका छोटेखानी कार्यक्रमात ते कार्यकर्त्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. राज्यातील विधानसभेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. त्यानंतर एक शपथविधी कार्यक्रम झाला. आणखी अनेक शपथविधीचे कार्यक्रम होतील. प्रत्येक नागरिकाला आता आपापल्या परिसरातील विकास कामाकडे लक्ष देण्याची वेळ आलेली आहे. जोपर्यंत नागरिक दक्ष होत नाही, तोपर्यंत विकास काम चांगल्या दर्जाचे होणार नाही. बोकाळलेला भ्रष्टाचार थांबवणे, हे प्रशासन यंत्रणेला शक्य होईल, असे चित्र दिसत नाही. कारण प्रशासनातील भ्रष्ट प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चाललेल्या आहेत. गप्पा मारताना समाज परिवर्तन आणि देशाच्या उभारणीच्या मारायच्या. मात्र प्रत्यक्ष काम करताना भ्रष्टाचार रोखण्यासाठी पुढे यायचे नाही. ही प्रवृत्ती आता शासन आणि प्रशासनात वाढलेली आहे. सामान्य नागरिकांच्या गरजा अत्यंत कमी असतात.

# रमाई योजनेतून मिळणार घरकुल

## जिल्हाभरातील ६ हजार गरिबांचे होणार घराचे स्वप्न साकार

**बीड ।** प्रतिनिधी

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागांतर्गत बीड जिल्ह्यात रमाई आवास योजना ग्रामीण योजनेंतर्गत २०२४ या आर्थिक वर्षात तालुक्यांचे उद्दिष्ट वितरित करण्यासाठी एकूण सहा हजार घरकुलांना मान्यता देण्यात आली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री निश्चित झाल्यानंतर त्यांची समिती प्रस्तावांना मंजुरी देणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून रमाई अंतर्गत घरकुलांसाठी पात्र लाभार्थींनी प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे. २०२४-२५ मध्ये आर्थिक वर्षासाठी सहा हजार घरकुलांचे उद्दिष्ट मंजूर करण्यात आले आहे. आयुक्त समाज कल्याण, आयुक्तालयाच्या मान्यतेनुसार तालुकानिहाय मंजुरी देण्यात आली आहे. तालुक्याला दिलेल्या उद्दिष्टांनुसारच रमाई आवास घरकुल योजनेचा लाभ



देण्यात येणार आहे. ही योजना सहायक आयुक्त समाज कल्याण बीड आणि प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येत आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. अर्जदार हा बेघर आणि त्याच्याकडे पक्के घर नसावे. २६९ चौ. फूट जागेचा उतारा आवश्यक आहे.

लाभार्थीचे एकूण उत्पन्न एक लाखांच्या आत असावे. जातप्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला असणारे व आतापर्यंत कोणत्याही योजनेतून घरकुलाचा लाभ न घेणारा इच्छुक लाभार्थी या योजनेसाठी पात्र ठरतो. यासाठी ग्रामपंचायतीने पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करते. यानंतर त्यास मंजुरी मिळते. यामुळे लाभार्थ्यांनी आपले प्रस्ताव तयार करुन ग्रामपंचायत मध्ये देण्यासाठी कामाला लागणे आवश्यक आहे.

## महाराष्ट्र संगणक परिचालक संघटनेच्या गेवराई तालुकाध्यक्षपदी शैलेश संत यांची फेरनिवड

**गेवराई ।** प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी शैलेश संत यांची फेरनिवड करण्यात आली. संघटनेच्या बैठकित विविध विषयावर चर्चा होत तालुका कार्यकारीणीत ईतर पदाधिकारी यांची निवड करण्यात आली.



महारृष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटनेचे राज्याध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे यांच्या आदेशाने व जेष्ठ संगणक परिचालक विलास देवकते व अशोक खरात यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुका संघटनेची बैठक पार पडली,यात संघटनेच्या मजबुतीकरणाच्या दृष्टीने काही धोरणात्मक निर्णय घेण्यात आले.यात संघटनेची कार्यकारीणी ठरवताना तालुका अध्यक्ष म्हणुन शैलेश संत यांची फेरनिवड करण्यात आली.तर ऊपाध्यक्ष म्हणुन लक्ष्मण घवाडे तर सचिवपदी अविनाश तुपे यांना निवडण्यात आले. संगणक परिचालकाच्या अडीअडचणीत संघटना कायम सोबत असे सांगत नुतन अध्यक्षांनी संघटनेच्या बळकटीकरणासाठु सर्व सदस्यांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.यावेळी सुखदेव शेंबडे, संतोष काळे, सचिन नाटकर, अमोल बिंगले, मुकुंद मडके, कृष्णा यादव, योगेश मस्के, राजेश राजगूरु, योगेश जोशी, संदिप कुलकर्णी यांच्यासह तालुक्यातील सर्व संगणक परिचालक ऊपस्थित होते.

## माजी मंत्री जयदत्त आण्णांच्या वाढदिवसानिमित्त इन्फंट इंडिया येथील मुलांना साहित्य वाटप



**बीड ।** प्रतिनिधी

लोकनेते माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त इन्फंट इंडिया आनंदाश्रम मंझेरी फाटा येथील मुलांना अल्पोपहार साहित्य फळ वाटप तसेच थंडी निमित्त उबदार टोप्यांचे वाटप करण्यात आले.

श्री गजानन नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त इन्फंट इंडिया आनंदाश्रम मंझेरी फाटा येथील मुलांना खाऊ व साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी आश्रमाच्या संचालिका संध्याताई बारगजे, गजानन बँकेचे संचालक अरूण डाके, राजेश तांगडे, दत्तात्रय डोईफोडे, अर्जुन बहिरवाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव क्षीरसागर, व्यवस्थापक विलास कुंबेफळकर, अनंत अडसुळे, वैभव शेडोळकर, पठाण आय्युब, संतोष पिंगळे, अमोल डोईफोडे, गणेश आणेराव, महेश गुजर आदि उपस्थित होते.

## देवगाव येथे लंपी लसीकरण व पशु जनगणना शिबिर संपन्न



**वडवणी ।** प्रतिनिधी

देवगाव येथील लंपी लसीकरण व पशुजनगणना शिबिराचे आयोजन श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी (सा) संचलीत पशुधन व्यवस्थापन व दुधोत्पादन पदविका विद्यालय, देवगाव ता.केज जि बीड व पशुवैद्यक व पशुविज्ञान म हाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाणाने महाराष्ट पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर २५ व्या स्थापना दिनानिमित्त डॉ. पंडित नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०६/१२/२०२४ रोजी मौजे देवगाव ता. केज जि. बीड येथे लंपी लसीकरण व पशुजनगणना डॉ.दिक्षांत जोगदंड व डॉ.वाकळे मंडाम व पशुधनपरवेक्षक शेलार एस.बी. यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मान्यवरांकडून लंपी लसीकरणा विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले तसेच पशुजनगनने विषयी माहिति देण्यात आली यावेळी विद्यालयाचे प्राचार्य बागलाने सर. कृषी विद्यालयाचे शेख सर ठोबरे व्हिवाय सर,कानडे सर.भोजने सर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी हजर होते.


## जाहीर प्रगटन

**मा.श्री. ओ. एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १७३५/२०२४**

**ॲड. श्रीधर नांदे यांच्या मार्फत**

**मक्ताबाई भ्र. नामदेव बजगुडे व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार- १. मुक्ताबाई भ्र. नामदेव बजगुडे, वय ७५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. बेलखंडी, (पा.) ता.जि. बीड

२. मधुकर पि. नामदेव बजगुडे, वय २५ वर्षे, धंदा - शेती, रा. करांडे मळा, आळते हातकणगले, जि. कोल्हापुर, ३. चंद्रकांत पि. नामदेव बजगुडे, वय ५० वर्षे, धंदा -शेती, रा. बेलखंडी, (पा.) ता.जि. बीड

४. प्रभावती भ्र. गणेश येळवे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. बेलखंडी, (पा.) ता.जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत नामदेव पि. लहानबा बजगुडे,** यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत नामदेव पि. लहानबा बजगुडे, यांचा मृत्यु दिनांक १७/१०/२०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत...

मयत नामदेव पि. लहानबा बजगुडे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत नामदेव पि. लहानबा बजगुडे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/१२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १७/०१/२०२५ आहे.**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) | शिक्का | (स्वाक्षरीत)
क.लिपीक | | अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड


# स्वराज्य नगर, गणपत नगर, पंचशीलनगर मध्ये एक कोटीच्या विकास कामाचा शुभारंभ

## बीड शहरात दर्जेदार रस्ते निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील : सचिन मुळूक

**बीड ।** प्रतिनिधी

शहरातील स्वराज्य नगर, गणपत नगर, पंचशीलनगर भागातील रस्त्यांचा प्रश्न अनेक दिवसांपासुन प्रलंबित होता. शिवसेनेचे मुख्य नेते तथा तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या भागातील रस्त्यासाठी एक कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला होता. आता रस्त्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल. आता पुन्हा राज्यात म हायुती सरकार स्थापन झाले असून शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील रस्त्यांसाठी भरीव निधी आणून दर्जेदार रस्ते निर्माण करण्यासाठी कायम प्रयत्नशिल असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.




शहरातील स्वराज्य नगर,गणपत नगर,पंचशीलनगर भागातील रस्ते, नाली व विकास कामांचा शुभारंभ रविवारी (दि.८) शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या प्रयत्नामुळे शहरातील स्वराज्य नगर, गणपत नगर भागातील अत्यंत महत्त्वाचा मुख्य रस्ता व नाली कामासाठी ६५ लक्ष रुपये व पंचशीलनगर भागातील विश्वरत्न कॉलनी येथे रस्ता व नाली साठी ३५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली. पुढे मुळूक म्हणाले की, शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात राज्यात अनेक विकास कामे झाली. त्याचाच एक भाग म्हणून आज या भागातील रस्त्यासाठी निधी मिळाला असून आज प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली. राज्यात पुन्हा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार आले असुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील रस्ते व विकास काम ांसाठी आणखी भरीव निधी आणून दर्जेदार रस्ते निर्मितीवर आमचा भर राहणार असल्याचे मुळूक म्हणाले. यावेळी स्वप्नील गलधर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास राष्ट्रवादी शिक्षक जिल्हाध्यक्ष प्रा. गोपाळ धांडे ,जिल्हा संघटक योगेश नवले ,भाजपाचे संदीप उबाळे, राहुल मस्के, वंजारे साहेब ,प्रमोद शिंदे, शिनगारे साहेब, हर्षद वडमारे ,हर्षद जोगदंड, रवी वाघम रे ,शिवसेना शहर प्रमुख नंदू पिंगळे , राजू हरकुडे, संजय नाईक , गणेश गळगटे सह स्वराज्य नगर ,गणपत नगर पंचशील नगर मधील नागरिक व महिला भगिनी तरुण मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## आजपासून श्री स्वामी समर्थ केंद्रात अखंड नाम जप यज्ञ सप्ताह व सामुदायिक गुरुचरित्र पारायण सोहळा

**वडवणी ।** प्रतिनिधी

दरवर्षी अतिशय नियमबध्द रीतीने श्रीदत्त जयंती सप्ताह साजरा होतो. या सप्ताहातील गुरुचरित्र पारायण सकाळी ८.३० ते १० दरम्यान सामूहिक रीतीने करण्यात येते. तेव्हा इच्छुकांनी पारायण सुरु होण्याच्या १५ मिनिट आधी केंद्रात हजर असणे आवश्यक आहे. याशिवाय सप्ताहामध्ये दररोज २४ तास प्रहरे दिले जातात. सकाळी ८ ते रात्री ८ महिला सेवेकरी व रात्री ८ ते सकाळी ८ पर्यंत पुरुष सेवेकरी प्रहर सेवा रुजू करतील. अशी माहिती श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने देण्यात दिली.

वडवणीत श्रीदत्त जयंतीनिमित्त शहरातील चिंचवण रोड स्थित दिंडोरी प्रणित श्रीस्वामी समर्थ सेवा केंद्रात ९ डिसेंबर पासून अखंड नाम जप, यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून हा सप्ताह दिंडोरी प्रणित श्रीस्वामी समर्थ सेवा केंद्रात वर्षभर होणाऱ्या उत्सवातील सर्वात महत्वाचा उत्सव मानला



जातो. दिंडोरी प्रणित अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्गाच्या चिंचवण रोड स्थित श्री स्वामी केंद्रात दरवर्षी सप्ताहात हजारो सेवेकरी उपस्थित रहातात. सप्ताहात सामूहिक गुरुचरित्र पारायण केले जाते, विशेष म्हणजे या पारायणासाठी शेकडो सेवेकरी आपला सहभाग नोंदवितात. ९ डिसेंबर ते १५ डिसेंबर पर्यंत म्हणजेच दत्त जयंती पर्यंत हा सप्ताह साजरा होणार आहे. यामध्ये दररोज सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, ८.१५ नित्य स्वाहाकार, ८.३० ते १० वाजता पर्यंत गुरुचरित्र वाचन, १०.३० ला नैवेद्य आरती, १०.४५ विषेश याग त्यानंतरदुपारच्या सत्रात दुपारी २ ते ५.३० वाजता दुर्गा सप्तशती व श्री स्वामी समर्थ पाठ वाचन, सायंकाळी ६ वाजता औदुंबर प्रदक्षिणा, ७ वाजता विविध विषयांवर मार्गदर्शन आणि ७.३० ला नित्यसेवा व नित्यध्यान केले जाते. या सप्ताहामध्ये दैनंदिन अध्यात्मिक कार्याशिवाय प्रत्येक दिवशी विशेष याग केले जातात. यामध्ये सप्ताहाच्या प्रथम दिवशी म्हणजेच ९ डिसेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता नित्य स्वाहाकार, मंडल स्थापना, अग्निस्थापना केल्या जाईल. १० डिसेंबर रोजी श्री गणेश याग, ११ डिसेंबर श्री गीताई याग, १२ डिसेंबर चंडी याग, १३ डिसेंबरश्री स्वामी याग, १४ डिसेंबर श्री रूद्र याग, श्री मल्हारी याग, १५ डिसेंबर रोजी बली पूर्णाहुती व दुपारी १२.३९ वाजता दत्त जन्म ोत्सव साजरा केला जाईल.

## लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात संत श्री संताजी जगनाडे महाराजांची जयंती साजरी



**लिंबागणेश ।** प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.०८ रविवार रोजी संत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रगतिशील शेतकरी सुदाम रणखांब यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत कर्मचारी जीवन मुळे, सुखदेव वाणी, कचरू निर्मळ,मधुकर रणखांब, जयदेव गिरे, शेषेराव थोरात आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मधुकर रणखांब यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष बालासाहेब जाधव यांनी आभार मानले.

श्री संत संताजी जगनाडे यांच्या महतीचा जीवनपट उलगडताना त्यांचे वारकरी संप्रदायाचे विचार आणि साहित्य हे प्रेरणादायी असुन सामाजिक बांधिलकी आणि ऐक्याचा संदेश देणारे आहे.जगदगुरू संत तुकाराम महाराज यांच्या जीवनकार्याचा मोठा प्रभाव त्यांच्या मनावर होता. तुकाराम महाराजांच्या किर्तनातील प्रमुख १४ टाळक-यांपैकी प्रमुख असणारे संताजी जगनाडे महाराज यांना तुकाराम महाराजांच्या गाथा इंद्रायणी नदीमध्ये बुडवल्यानंतर सुद्धा त्याचे पुन:र्लेखन जगनाडे महाराजांनी केल्याने आपणास त्यांची महती कळत असल्याचे डॉ. गणेश ढवळे यांनी प्रतिपादन केले.

दैनिक ● epaper.marathwadapatra.com
सोमवार, दि.०९ डिसेंबर २०२४ पान ४
# मराठवाडा पत्र
● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955

# खगोलप्रेमींसाठी पर्वणी! 13 अन् 14 डिसेंबरला जेमिनिड्सचा उल्का वर्षाव

## खगोलीय घटना : दर तासाला निर्माण होणार किमान 120 उल्का



अमरावती । प्रतिनिधी

१३ व १४ डिसेंबरच्या रात्री आकाशात पूर्व दिशेला उल्का वर्षाव होताना दिसेल. याला जेमिनिड्या उल्का वर्षाव (Geminids Meteor Shower) म्हणतात. हा लघुग्रह व ३२०० फेथॉन नावाच्या छोट्याशा खगोलीय वस्तूंमुळे तयार होतो. ही वस्तू धुमकेतू व लघुग्रह यामधली एक मानली जाते.

हा उल्का वर्षाव खगोलप्रेमी व अभ्यासकांना साध्या डोळ्यांनी पाहता येणार असल्याची माहिती खगोल अभ्यासकांनी दिली. अंधाऱ्या रात्री आकाशाचे निरीक्षण करीत असताना क्षणार्धात एखादी प्रकाशरेषा चमकून जाताना आपण पाहतो. या घटनेस 'तारा तुटला' असे म्हटले जाते; परंतु तारा कधीही तुटत नाही. ही एक खगोलीय घटना आहे व यालाच 'उल्का वर्षाव' म्हणतात.

उल्काचे निरीक्षण व शास्त्रीय नोंदी याची खगोल जगतात खूप गरज आहे.

### ▸हे तर धुमकेतू, लघुग्रहाचे अवशेष

**जेमिनिड्स उल्का वर्षाव हा ३२०० फेथॉन नावाच्या एका छोट्या खगोलीय वस्तूमुळे होतो. ही वस्तू धूमकेतू आणि लघुग्रह यांच्यामधील एक प्रकार मानली जाते. धुमकेतू किंवा लघुग्रह सूर्याला प्रदक्षिणा मारत असताना त्यातील काही भाग मोकळा होतो. हे त्यांचे अवशेष आहेत. याबाबत काही अंधश्रद्धा असल्या तरी याला खगोलशास्त्रात कुठेही थारा नाही.**

त्यामुळे बाह्य अवकाशातील वस्तूचे नमुने या उल्केमुळे आपणास मिळतात व यामुळे वस्तूच्या जडणघडणेचा अर्थ लावता येतो. या उल्का वर्षावाचे विलोभनीय दृश्य अवश्य बघावे, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरूळकर यांनी केले आहे.

# गर्भावस्थेत विधिमंडळाच्या दाराशी...

## भाजप महिला आमदाराची भावूक पोस्ट



आई ... तुम्ही कुठल्याही क्षेत्रात काम करत असाल तर आईपण तुम्हाला अधिक बळ देतं. एखादी स्त्री जर आई झाली तर ती अधिक ताकदीने संकटांना सामोरी जाते. तिचं आईपण कधीच तिच्या कामाच्या आड येत नाही, हे अनेक महिलांनी सिद्ध केलं आहे. राजकीय जीवनात वावरत असताना नेत्यांच्या पाठीमागे कामाचा ताण असतो. लोकांच्या भेटीगाठी असतात. अशात कुटुंबाला वेळ देणं तसं पाहिलं तर तारेवरची कसरत असते. पण जर तुम्ही आई असाल तर मात्र आपल्या मुलांसाठी तुम्ही वेळ काढताच.....बीड मधील केडच्या आमदार नमिता मुंदडा या लाडकी लेक वियानाला घेऊन अधिवेशनाला आल्या होत्या. याबद्दल त्यांनी फेसबुकवर भावूक पोस्ट शेअर केलीय. लेक वियाना ही दोन महिन्यांची होती, तेव्हा नमिता मुंदडा तिला घेऊन विधिमंडळात आल्या होत्या. त्यावेळी दोन महिन्यांच्या लेकीला घेऊन विधिमंडळात आल्याने प्रचंड चर्चा झाली होती. आता नमिता यांची लेक वियाना पाच वर्षांची झाली आहे. तिला घेऊन नमिता मुंदडा विधिमंडळाच्या अधिवेशनात आल्या होत्या. फडणवीस सरकारचं पहिलं विशेष अधिवेशन होत आहे. या विशेष अधिवेशन काळात नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी पार पडला. या पहिल्या दिवशी नमिता लेक वियानाला घेऊन आल्या होत्या.

### नमिता मुंदडा यांची फेसबुक पोस्ट

पाच वर्षांपूर्वीची ती सकाळ अजूनही माझ्या मनात कोरलेली आहे. गर्भवती अवस्थेत, हृदयात असंख्य स्वप्नं, भीती आणि अनेक जबाबदाऱ्या घेऊन मी पहिल्यांदा विधिमंडळाच्या दाराशी उभी होते. माझ्या पोटात वाढत असलेल्या छोट्या जीवाने मला त्या क्षणाला आधार दिला, जणू तिच्या स्पंदनातून ती म्हणत होती, आई, तू हे करू शकतेस ! आज पाच वर्षांनंतर तीच माझी चिमुकली कन्या वियाना आता पाच वर्षांची झाली आहे. तिच्या छोट्या हातात हात धरून पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा मी शपथविधिच्या निमित्ताने विधिमंडळाच्या दारात उभी आहे. हा क्षण माझ्यासाठी एक आमदार म्हणूनच नव्हे तर एक आई म्हणून खूप आनंददायी आहे. तिच्या डोळ्यांत माझ्याबद्दलचा अभिमान पाहून माझं हृदय भरून आलंय. तिच्या लहानशा हातांनी माझं बोट घट्ट धरलेलं पाहून वाटतंय- संघर्षाचा प्रत्येक क्षण, त्यागाचं प्रत्येक पाऊल सार्थ ठरलं.

# गंभीर गुन्हे नोंद असलेल्या २४५ जणांचा परवाना रद्द करण्यासाठी पोलिसांचा जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव

बीड । प्रतिनिधी

बंदूकीचा परवाना घेताना संरक्षणासाठी म्हणून मागणी करण्यात येत आहे. परंतु जिल्ह्यातील तब्बल २४५ परवाना धारकांकडे परवाने असून यात कहर म्हणजे १०,१२,१४ अन् १६ गुन्हे दाखल असणाऱ्यांकडेही बंदुकीचा परवाना असून असे लोकही कंबरेला बंदूक लावून फिरत आहेत. यामुळे बंदूक संरक्षणासाठी की, धाक निर्माण करण्यासाठी? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याप्रकरणी पोलीस अधीक्षक यांनी लक्ष घातले असून गुन्हे दाखल असणाऱ्या २४५ जणांचे परवाने रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना पत्र पाठविले आहे. बीड जिल्ह्यात अवैधरित्या गावठी पिस्टल वापणारे अनेकजण पकडले गेले असून,त्यांच्यावर गुन्हेही दाखल झाले आहेत. पण विकासाचा अन् उद्योगांचा दुष्काळ असलेल्या बीड जिल्ह्यात परवाना धारक बंदूक वापरणाऱ्यांची संख्या कमी नाही. सध्या जिल्ह्यात १ हजार २८१ जणांकडे परवाना धारक बंदूक आहेत. नवीन मागणीचे प्रस्ताव सध्या मंजुरी विना पडून आहेत. जिल्ह्यात मागील काळात अनेक ठिकाणी फायरिंगच्या घटना घडलेल्या आहेत. यामुळे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी याप्रकरणी लक्ष घालून अवैधरित्या बंदूक वापरणाऱ्यांचा शोध घेऊन गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. या आदेशानुसार पोलीस यंत्रणेने अनेकांना शोधून त्यांच्याकडून गावठी पिस्टल जप्त करुन गुन्हे दाखल केले. तसेच परवानाधारक बंदूक वापरणाऱ्यांची पडताळणी केली. यामध्ये धक्कादायक प्रकार उघडकीस आला. यामध्ये गुन्हे दाखल असणाऱ्या २४५ जणांकडे बंदूकीचा परवाना असल्याचे निदर्शनास आले. यात चार परवानाधारक बंदूक वापऱ्याऱ्यांवर १०, १२, १४ अन् १६ गुन्हे दाखल आहेत. ते राजरोसपणे कमरेला बंदूक लावून फिरत आहेत. यामुळे बंदूक संरक्षणासाठी आहे की, लोकांवर धाक निर्माण करण्यासाठी आहे. असा प्रश्न सामान्य जनतेतून विचारला जात आहे.






बीड शहरातील पेठ बीड भागातील श्री.संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या मंदिरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आरती केली. यावेळी समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# केज-कळंब रोडवर अपघात तरुण ठार.!

केज । प्रतिनिधी





केज-कळंब रोडवर माळेगाव नजीक कार ने दुचाकीला समोरून धडक दिली या अपघातात दुचाकीवरील तरुण व महिला जखमी झाले होते.मात्र उपचारादरम्यान २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला तर अन्य दोघे जखमी झाले आहेत. सदर घटना शनिवारी सायंकाळी सहा वाजता घडली.

माळेगाव येथील रहिवासी अशोक मारुती चिरके (वय २५) व वनिता धर्मराज गायकवाड वय ५० (रा सुकळी)हे दोघे एमएच ०५ एई ११९२ क्रमांकाच्या दुचाकीवरून शेतातील कामे उरकून घराकडे जात होते. त्याच वेळी केजहुन एमएच २३ बिसी ६३८३ ही भारत सरकार लिहिलेली कार कळंबकडे जात होती. माळेगाव नजीक कार चे नियंत्रण सुटून उजव्या बाजूने चालणार्या दुचाकी ला समोरून जोराची धडक दिली. यात दुचाकी वीस फूट फरफटत गेली. त्यामुळे अशोक चिरके याच्या कमरेला आणि पायाला गंभीर दुखापत झाली तर मागे बसलेल्या वनिता गायकवाड या देखील जखमी झाल्या. अपघात घडल्यानंतर कार रस्त्याच्या बाजूला पंधरा फूट खड्ड्यात जाऊन पडली. अपघातावेळी कार मधील एअर बॅग उघडल्याने दोन महिला, दोन पुरुष आणि लहान मुलगा यांना सुदैवाने गंभीर दुखापत झाली नाही.

अपघातानंतर गावातील तरुणांनी जखमींना अंबाजोगाई च्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात केले. मात्र अशोक चिरके या तरुणाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. अपघातात दुचाकी व कारचे मोठे नुकसान झाले आहे.सदर कार वर भारत सरकार लिहिलेले दिसून येत असल्याने सदर गाडी नेमकी कुणाची आहे ? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### तुकाराम होले सर यांचे दुःखद निधन



बीड : सरळ सज्जन व्यक्तिमत्व असणारे कायम दुसऱ्यांना मदत करणारे कोळवाडी जिल्हा परिषदचे मुख्याध्यापक तुकाराम होले सर यांचे निधन. आपल्या कर्तव्यावर जात असताना कोळवाडी जवळ पाठीमागून येणाऱ्या अज्ञान वाहनाने दिलेल्या धक्क्यामुळे त्यांचा अपघात झाला होता. त्यांना काकू नाना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले होते. ४ दिवस शर्यतीचे प्रयत्न करण्यात आले परंतु शेवटी त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या अकाली जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# शेतकऱ्यांचे कैवारी, विकासाचे व्हिजन असलेले, अठरापगड जाती धर्माला सोबत घेऊन चालणारे लढवैय्या नेतृत्व

## ▸आ.सुरेश आण्णा धस यांना पक्षश्रेष्ठींनी कॅबिनेट मंत्री करावे:सतिश जगदाळे

आष्टी । प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणुकीत भाजप महायुती सरकारने ऐतिहासिक विजय मिळवला आहे.आष्टी विधानसभा मतदारसंघात देखील भाजप महायुतीचे उमेदवार आ.सुरेश आण्णा धस यांनी न भूतो न भविष्यती असा बहुमताने ७८ हजाराचे लिड घेऊन ऐतिहासिक विजय मिळवला आहे.त्यांना राजकारणाचा दांडगा अनुभव असून ३ वेळा विधानसभा सदस्य तर १ टर्म विधानपरिषद आमदार असताना धडाकेबाज कामगिरी केली आहे.नागरीकांसाठी केसेस अंगावर घेणारे एकमेव आमदार सुरेश धस हे आहेत.गोरगरीब कष्टकरी सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असून अठरापगड जातीतील लोकांना सोबत घेऊन लोकांच्या सुख दुखात अहोरात्र धावून जात असतात म्हणून लोकांनी त्यांना कौल दिला आहे मतदार संघाला त्यांच्या पदाचा फायदा होतोच तसेच त्यांना कॅबिनेट मंत्री पद दिल्यास यांचा राज्यातील नागरीकांना फायदा होईल सर्वसामान्य जनतेला न्याय मिळण्यासाठी आ.धस यांना नव्याने होणाऱ्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपद देऊन पक्षश्रेष्ठींने न्याय द्यावा अशी मागणी चेअरमन सतिश जगदाळे यांनी केली आहे.

आष्टी, पाटोदा, शिरूर मतदारसंघात आ. सुरेश धस हे आष्टी विधानसभेच्या निवडणुकीत भूतो ना भविष्य असे विक्रमी मताधिक्याने निवडून आले असून जनसेवेत असलेले सर्वसामान्यांच्या अडीअडचणीच्या काळात सदैव तत्पर राहून त्यांच्या अडीअडचणी सोडविणारे नेतृत्व म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे. मतदारसंघाच्या गावागावांमध्ये रस्ते, वीज, पाणी देवस्थानचा विकास भक्तनिवास, तरुणांना रोजगाराची संधी, मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी विकासभिमुख नेतृत्व म्हणून अण्णांची ओळख असून ते लाडके नेतृत्व असून अठरापगड जातींना सोबत घेऊन चालणारा हा नेता आहे कोणत्याही परिस्थितीत न डगमगता कायम धाडसी निर्णय घेत आहेत अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांनी मार्गी लावलेले आहेत. वेळोवेळी पोटतिडकीने त्यांनी सभागृहात मतदार संघाचे प्रश्न मांडले आहेत.कोरोनाच्या महामारीत देखील महाराष्ट्रात सर्वात अधिकचे कोविड सेंटर त्यांनी उभारून नागरिकांचे प्राण वाचवले आहेत. महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्रीपद देखील भुषविले आहे. त्यांच्या अनुभवाचा योग्य तो सन्मान करून त्यांना कॅबिनेट मंत्री पद द्यावे त्यांच्या अनुभवाचा



आष्टी विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्राला फायदा होईल गोरगरीब कष्टकरी यांच्या न्यायासाठी त्यांना कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे असल्याचे नव्याने होत असलेल्या मंत्रिमंडळात आ.सुरेश आण्णा धस यांना संधी देऊन पक्षश्रेष्ठींनी न्याय द्यावा अशी मागणी चेअरमन सतिश जगदाळे यांनी केली आहे.

CMYK